डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.
(मल्टी स्टेट शेड्यूल्ड बँक)
दि. 30 सप्टेंबर, 2024 रोजी झालेल्या 54 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

डोंबिवली नागरी सहकारी बँकेची 54 वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दि. 30 सप्टेंबर, 2024 रोजी सकाळी 9.30 वाजता सावित्रीबाई फुले कला मंदिर, एम्.आय्.डी.सी,डोंबिवली (पूर्व) येथे योजली होती.

सभेच्या निर्धारित वेळी गणसंख्या पुरेशी नसल्याने व सदर सभा 10.00 वाजता सुरु होईल तसेच या सभेस गणसंख्येचे बंधन नसेल अशी घोषणा मा. सरव्यवस्थापक श्री. सिंग यांनी केली.

सकाळी ठीक 10.00 वाजता राष्ट्रगीताने सभेची सुरुवात झाली. बँकेचे मा. अध्यक्ष धारगळकर यांनी प्रास्ताविक केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी आर्थिक वर्ष 2023-24 तसेच चालू आर्थिक वर्षातील घडामोडींची माहिती दिली. तसेच त्या अनुषंगाने सादरीकरणही केले.

मा. अध्यक्षांच्या प्रास्ताविकानंतर, मा. सरव्यवस्थापक श्री रमेश सिंग यांनी सभेची सूचना वाचून दाखविली व सभेच्या कामकाजास प्रारंभ झाला.

विषय क्रमांक 1- संचालक मंडळाने सादर केलेला दि. 31-03-2024 अखेरच्या वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक तसेच नफा वाटणी मंजूर करणे आणि वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे.

या विषयाची मांडणी मा. संचालक सी.ए.श्री.जयंत पित्रे यांनी केली. नफा-तोटा पत्रकाची सविस्तर माहिती त्यांनी दिली. गतवर्षीच्या निव्वळ नफ्यात 5 टक्के वाढ होऊन, मार्च 2024 अखेर निव्वळ नफा ₹ 23.93 कोटी झाला. उत्पन्न व खर्चाची सविस्तर माहिती वार्षिक अहवालातील पान क्र. 14,15, 16 व 17 वर दर्शविली असल्याचे त्यांनी सांगितले. सिक्युरिटी रिसिप्टची मार्केट व्हॅल्यू ₹165 कोटी आहे. परंतू, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्देशांचे पालन करण्यासाठी ₹ 105 कोटींची तरतूद केली आहे. सिक्युरिटीजचे पुस्तकी मूल्य ₹ 13 कोटी शिल्लक राहिले आहे. पुढील वर्षीच्या नफा क्षमतेवर त्याचा चांगला परिणाम होईल.

कर्ज व्यवहारात यावर्षी वाढ झाली. त्यामुळे कर्जावरील व्याजाच्या उत्पन्नातही वाढ झाली आहे. केंद्रीय कार्यालयाची संपूर्ण नवीन वास्तू तयार झाली आहे, त्यावरील घसारा खर्च वाढला आहे. त्यामुळे गतवर्षीच्या तुलनेत उत्पन्नात घट झालेली दिसते.

कर्ज व्यवहारात आणि ठेवींमध्ये वाढ झालेली आहे. मात्र, बँकेचे भाग-भांडवल कमी झाले आहे. 2022-23 चा लाभांश न मिळाल्यामुळे अनेक सभासदांनी भाग-भांडवल परत मागितले आहे. या पार्श्वभूमीवर, 2023-24 चा लाभांश वितरीत करण्यास भारतीय रिझर्व्ह बँकेची अनुमती मिळाल्यानंतरच वार्षिक सर्वसाधारण सभा योजण्याचा निर्णय घेतला आहे.

गंगाजळी व इतर राखीव निधीत चांगली वाढ झाली आहे. ती रक्कम ₹ 335 कोटींवरून ₹387 कोटींवर पोहोचली आहे. कर्जांवरील मिळकत (Yield on Advances) 9.52% वरून 9.88%

वर गेली आहे, तर ठेवींवरील खर्चात थोडी वाढ झाली असून, ते प्रमाण 3.83% वरून 4.36% वर पोहोचले आहे. व्याजातील तफावत (Net Interest Margin - NIM) 5.69% वरून 5.52% अशी थोड्या प्रमाणात कमी झाली आहे. कासा प्रमाण 40% व CRAR 15.57% आहे. ठेवी व कर्जांचे प्रमाणही ही (CD Ratio) योग्य म्हणजेच 64% राखले आहे. सर्व तरतुदी वजा करून निव्वळ नफ्याची विभागणी (Profit Appropriation) पान क्र. 10 वर दर्शविली असल्याचेही त्यांनी सांगितले.

या विषय मांडणीनंतर सभासदांनी काही शंका/ प्रश्न विचारण्यास सांगितले. या प्रश्नांची उत्तरे मा. संचालक सर्वश्री सी.ए. विजय शेलार व सी.ए. अभिजीत मराठे यांनी दिली.

एक सभासद – या वर्षात दंड का लागला ? कर्ज वाटपाच्या प्रमाणात गृहकर्ज वाटपाचे प्रमाण अधिक दिसते. ते उल्लंघन नाही का ? शिल्लक नफा ₹ 12.78 कोटी दिसतो तो कसला ? वर्ष 2022-23 चा लाभांश मिळणार का ? त्याबाबत बँकेने रिझर्व्ह बँकेकडे पाठपुरावा सुरु ठेवावा.

सी. ए. श्री. शेलार – 2022 मध्ये जो Cyber Attack झाला त्याबद्दल RBI ने दंड आकारला आहे.
गृहकर्ज वाटपाच्या प्रमाणात कोणतेही उल्लंघन झालेले नाही.
शिल्लक असलेला ₹ 12.78 कोटी नफ्यातूनच सन 2023-24 चा लाभांश देण्यात येणार आहे.
वर्ष 2022-23 चा लाभांशाबाबत भारतीय रिझर्व्ह बँकेकडे पाठपुरावा सुरु आहे.

सभासद श्री. जाधव – गेली चार वर्ष बँकेने लाभांश दिला नाही. त्यामुळे सभासदांचे नुकसान झाले आहे. 2022-23 च्या लाभांशाकरीता रिझर्व्ह बँकेकडे पाठपुरावा करण्यात यावा.

सी. ए. श्री. शेलार – तुमची माहिती चुकीची आहे. सन 2021-22 चा लाभांश देण्यात आला. 2022-23 चा लाभांश देण्यास रिझर्व्ह बँकेने अनुमती नाकारली असली तरीही याविषयी भारतीय रिझर्व्ह बँकेकडे पाठपुरावा सुरु आहे. 2023-24 चा लाभांश आपण देणार आहोत.

श्री. बाळासाहेब खारीक (सभासद क्र. 21292)- लाभांश जाहीर केल्याबद्दल अभिनंदन. सह-सभासद म्हणजे कोण ?

सी. ए. श्री. शेलार – धन्यवाद ! सभासदाच्या बरोबर ज्याने संयुक्तपणे भाग घेतले असतील व ज्याचे दुसरे नाव भाग-पत्रकावर नमूद असेल तो सह-सभासद होय.

एक सभासद –पान क्र. 16 वर Deferred Tax ₹ 929.13 वरून ₹ 191.70 दर्शविला आहे. याचा बँकेच्या नफ्यावर काही परिणाम होईल का ?

सी. ए. श्री. शेलार – बँकेच्या नफ्यावर याचा कोणताही परिणाम होणार नाही.

श्री. नारायण दा. कीर्तने (सभासद क्र. 105431) – ठेवींवरील व्याज कमी आहे.

सी. ए. श्री. शेलार – याबाबत योग्य वेळी, योग्य विचार केला जाईल.

श्री. निलेश सारंग (सभासद क्र. 87661) – 2022-23 चा लाभांश का दिला नाही ? यावर्षी अनुमती कशी मिळाली ? 2022-23 च्या लाभांशाकरीता रिझर्व्ह बँकेकडे सातत्याने पाठपुरावा व्हावा.

सी. ए. श्री. शेलार – भारतीय रिझर्व्ह बँकेने अनुमती दिली नाही म्हणून 2022-23 चा लाभांश अदा केलेला नाही. मात्र, याविषयी बँक भारतीय रिझर्व्ह बँकेकडे पाठपुरावा करीत आहे.

रिझर्व्ह बँकेने सांगितलेल्या सर्व तरतुदी केल्या असल्याने व चांगला नफा झाल्याने यावर्षी लाभांश देण्यास भारतीय रिझर्व्ह बँकेने अनुमती दिली आहे.

श्री. भास्कर भावसार (सभासद क्र. 11023)- लाभांश दिल्याबद्दल समाधान वाटते. बँकेच्या संचालक मंडळाचे अभिनंदन
सी. ए. श्री. शेलार – धन्यवाद !

श्री. सुरेश जोशी (सभासद क्र. 24086) – Cyber Attack मार्च 2022 मध्ये झाला. त्याचा दंड आत्ता का ? पुन्हा असे होणार नाही याची काळजी घेतली आहे का ?

मा. संचालक श्री. वाळुंजकर – अनेक बँकांवर Cyber Attack झाला. त्यानंतर अनेक प्रकारचे निर्देश भारतीय रिझर्व्ह बँकेने सर्वच बँकांना दिले होते. त्याची अंमलबजावणी आता झाली आहे. पुन्हा Cyber Attack होऊ नये अशी काळजी आपण घेतली आहे.

श्री. विनायक जांभेकर (सभासद क्र. 43497) – CRR/ SLR च्या गुंतवणूकीवर तरतूद कशासाठी ? सिक्युरिटी रिसिटसवर तरतूद का ?

सी. ए. श्री. शेलार – सिक्युरिटी रिसिप्टसचे बाजारमुल्य जास्त आहे. तरीदेखील भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्देशांप्रमाणे तरतूद करावी लागते. CRR/ SLR च्या गुंतवणूकीवरही भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्देशांप्रमाणे तरतूद केली आहे. हे निर्देश सर्व बँकांसाठी बंधनकारक आहेत.

श्री. लक्ष्मीकांत भोसले (सभासद क्र. 102359)- भागधारक कल्याण निधीत तरतूद केलेली दिसत नाही.

सी. ए. श्री. शेलार – भागधारक कल्याण निधीत पुरेशी शिल्लक आहे. त्यात आज ₹ 1.76 कोटी शिल्लक आहेत. त्यामुळे अधिक तरतुदीची आवश्यकता नाही.

श्री. उदय कर्वे (सभासद क्र. 20902) – बँकेची आर्थिक प्रगती अतिशय चांगली आहे. येथे भेटलेल्या सभासदांनी बँकेवर, बँकेच्या संचालक मंडळावर विश्वास व्यक्त केला आहे. येत्या 2 – 3 वर्षात आपण पूर्वीप्रमाणेच अधिक लाभांश देऊ शकू असा मला विश्वास आहे. त्यामुळे अनेक सभासद आपले भाग-भांडवल परत मागणीचे अर्ज मागे घेतील, किंबहुना अधिकच्या भाग-भांडवलाची मागणी करतील. मी स्वतः अधिकच्या भाग-भांडवलासाठी उद्याच अर्ज करणार आहे.

मा. संचालक सी. ए. श्री. शेलार – आपण दाखविलेल्या विश्वासाबद्दल मनापासून आभार.

श्री. महादेव ढोकळे (सभासद क्र. 129664)- सभासदांचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी.

सी. ए. श्री. शेलार – सभासदांच्या हितासाठीच सगळे संचालक मंडळ व अधिकारी- कर्मचारी काम करत आहेत.

श्री. नरहर रामचंद्र शिरूडे (सभासद क्र. 49061) – बँकेची अजून चांगली आर्थिक प्रगती होण्यासाठी बँकेला चांगले कर्जदार आपण मिळवून देऊया.

मा. संचालक सी. ए. श्री. शेलार- धन्यवाद . अत्यंत स्वागतार्ह सूचना आहे. सर्वांनी याचा अवश्य विचार करावा.

श्री. शशिकांत जाधव (सभासद क्र. 41884) – गुंतवणूक चढ-उतार निधी कमी आहे. निर्लेखित कर्जांमधून वसुली केली जात नाही.

सी. ए. श्री. शेलार – गुंतवणूक चढ-उतार निधी कमाल 5% असावा असे भारतीय रिझर्व्ह बँकेचे निर्देश आहेत. आपला निधी 3% आहे.

आपण दिशाभूल करत आहात. निर्लेखित कर्जांमधून व्यवस्थित वसुली केली जाते. आर्थिक वर्ष 2023-24 मध्ये ₹ 35/- कोटी निर्लेखित कर्जांतील वसुली केली आहे. चालू आर्थिक वर्षात आत्तापर्यंत ₹ 15/- कोटींची वसुली झाली आहे. तशी वार्षिक अहवालात पान क्र. 7 वर नोंद केली आहे. ती तपासून पहावी.

यानंतर कोणत्याही सभासदांचे या विषयात प्रश्न नसल्याने मा. संचालक सी. ए. श्री. विजय शेलार यांनी पुढील ठराव मांडला.

ठराव क्रमांक -1 दि. 31-03-2024 रोजी संपलेल्या वर्षाचा, संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल आणि लेखापरीक्षकांनी तपासलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रक ही सर्वसाधारण सभा स्वीकृत करत आहे. तसेच नफा वाटणीस मंजूरी देत आहे.

संचालक मंडळाने वार्षिक अहवालात उल्लेख केल्याप्रमाणे, भारतीय रिझर्व्ह बँकेने सभासदांना तसेच प्राधान्यक्रमाच्या भाग-भांडवलावर लाभांश वितरण करण्यास परवानगी दिली आहे.

त्या अनुषंगाने सर्वसाधारण भाग-भांडवलावर कमाल 8.75 टक्के व प्राधान्यक्रमाच्या भाग-भांडवलावर (म्हणजे प्रेफरन्स शेअर्सवर) कमाल 9 टक्के दराने लाभांश देण्यास ही वार्षिक सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे.

तसेच, वैधानिक लेखापरीक्षकांनी सन 2023-24 या आर्थिक वर्षासाठी दिलेल्या बँकेच्या हिशेब तपासणी अहवालाची, ही सभा नोंद घेत आहे.
सूचक – श्री. विभावरी विश्वनाथ पुराणिक (सभासद क्र. 82271)
अनुमोदक – श्री. अशोक हेमराज शाह (सभासद क्र. 49553)

ठराव एकमताने मंजूर

<u>विषय क्रमांक 2</u> – सन 2022-2023 या आर्थिक वर्षाचा दोष दुरूस्ती अहवाल (Compliance Report) सादर करण्यात आल्याची नोंद घेणे.
आर्थिक वर्ष 2022-23 चा दोष-दुरुस्ती अहवाल केंद्रीय सहकार आयुक्तांच्या कार्यालयात दि. 01 सप्टेंबर, 2023 रोजी सादर केल्याची माहिती मा. संचालक श्री. चौधरी यांनी दिली व त्याची पोहोच (Acknowledgement) पडद्यावर दर्शविण्यात आली.

याविषयी कोणाचीही शंका / प्रश्न नाहीत याची खात्री करून मा. संचालक श्री. चौधरी यांनी पुढील ठराव मांडला.

<u>ठराव क्रमांक 2 -</u> सन 2022-23 या आर्थिक वर्षासाठीच्या हिशेब तपासणी अहवालाचा दोष-दुरुस्ती अहवाल (Compliance Report) केंद्रीय सहकार विभागाकडे दिनांक 01-09-2023 रोजी सादर झाला आहे. सदरच्या कार्यवाहीची ही सभा नोंद घेत आहे.
सूचक – श्री. नागेश गणेश नायक (सभासद क्र. 70747)
अनुमोदक – श्री. वासुदेव विनायक काबाडी (सभासद क्र. 31504)

ठराव एकमताने मंजूर

<u>विषय क्रमांक 3 –</u> आर्थिक वर्ष 2024-25 करीताच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
या विषयाची मांडणी सरव्यवस्थापक श्री. रमेश सिंग यांनी केली. अंदाजपत्रक मांडताना रिटेल कर्ज व्यवहारांवर बँकेचा भर राहिल असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच कामकाजात सुधारणा करून, नफा वाढीसाठी प्रयत्न जातील, बँकेच्या ठेवी ₹ कोटी तर कर्ज व्यवहार ₹ कोटींपर्यंत पोहोचेल असेही त्यांनी सांगितले.

याविषयी कोणाचीही शंका / प्रश्न नाहीत याची खात्री करून सरव्यवस्थापक श्री. सिंग यांनी पुढील ठराव मांडला.

<u>ठराव क्रमांक 3-</u> सन 2024-25 या आर्थिक वर्षासाठी संचालक मंडळाने मंजूर केलेल्या बँकेच्या अंदाजपत्रकास ही वार्षिक सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे.
सूचक – श्री. विलास शंकर मोरे (सभासद क्र. 19674)
अनुमोदक – श्री. अशोक बा. जोशी (सभासद क्र. 42762)

ठराव एकमताने मंजूर.

<u>विषय क्रमांक 4</u> -संचालक मंडळाने आर्थिक वर्ष 2024-25 साठी मंजूर केलेली वार्षिक योजना (Annual Operational Plan) सभेपुढे सादर करणे.
मा. उपाध्यक्षा सौ. कुलकर्णी यांनी या विषयाची मांडणी केली. गेल्या आर्थिक वर्षात 13280 बचत खाती तसेच 1694 चालू खाती उघडली गेली. म्हणूनच ह्यावर्षी 20000 बचत खाती तर 2,000 चालू खाती नव्याने सुरू करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवल्याचे त्यांनी सांगितले. अन्य काही प्रश्न नसल्याने सौ. कुलकर्णी यांनी पुढील ठराव मांडला.

<u>ठराव क्रमांक 4</u> –आर्थिक वर्ष 2024-25 साठी संचालक मंडळाने मंजूर केलेली बँकेची वार्षिक योजना खालीलप्रमाणे आहे.

(1) बचत खात्यांची संख्या सुमारे 22,000 ने वाढविणे.
चालू खात्यांची संख्या सुमारे 3,000 ने वाढविणे.
CASA ठेवींचे प्रमाण 2% ने वाढविणे.

(2) Gross NPA व NET NPA चे प्रमाण कमी करणे.
(3) SME व MSME कर्ज व्यवहार वाढविण्यावर भर देणे.

बँकेची वार्षिक सभा या वार्षिक योजनेला मंजूरी देत आहे.

सूचक – श्री. भास्कर रा. रणदिवे (सभासद क्र. 5812)
अनुमोदक – श्री. विलास वामन जोशी (सभासद क्र. 48104)
ठराव एकमताने मंजूर.

विषय क्रमांक 5 – बँकेचे संचालक तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या बँकेत कार्यरत असलेल्या नातेवाईकांबाबत माहिती घेणे.

मा. संचालक श्री. खरपडे यांनी याविषयाची मांडणी केली. बहुराज्यीय सहकारी कायदा 2002 च्या कलम 39(1) (एल) मधील तरतुदींप्रमाणे बँकेच्या सेवेत कार्यरत असलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सरव्यवस्थापक) यांचे तसेच संचालकांचे कोणीही नातेवाईक बँकेच्या सेवेत नसल्याचे त्यांनी सांगितले.

याविषयी सभेने कोणतीही शंका उपस्थित केली नाही. श्री. खरपडे यांनी पुढील ठराव सभेपुढे सादर केला.

ठराव क्रमांक 5 – बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिका-याचे कोणीही नातेवाईक बँकेचे कर्मचारी म्हणून कार्यरत नाहीत.

तसेच विद्यमान संचालक मंडळातील कोणत्याही संचालकांचे कोणीही नातेवाईक बँकेचे कर्मचारी म्हणून कार्यरत नाहीत, याची ही सभा नोंद घेत आहे.
सूचक – श्री. भास्कर का. भावसार (सभासद क्र. 11023)
अनुमोदक – श्री. अनिल ज. सरदेसाई (सभासद क्र. 51240)
ठराव एकमताने मंजूर

मा. संचालिका सौ. आंबेकर यांनी पुढील विषय सभेपुढे ठेवला.

विषय क्रमांक 6 – संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरुस्तीस मान्यता देणे.

संचालक मंडळाने बँकेच्या पोटनियमात काही दुरुस्ती/ बदल तसेच वाढ प्रस्तावित केले असून त्याविषयीचे सविस्तर विवरण वार्षिक अहवालात केले आहे. त्याबाबतची माहिती मा. संचालिका सौ. मेघना आंबेकर यांनी विषय मांडणी केली.

एक सभासद – संचालक संख्या 11 करण्याचे कारण काय ?

मा. संचालिका सौ. आंबेकर – निर्णयात सुसुत्रता यावी. लवकर निर्णय घेता यावेत.

सी.ए. श्री. उदय कर्वे (सभासद क्र. 20902) – संचालक निवडणूकीसाठी उमेदवाराचे वय वर्षे 70 पेक्षा अधिक असेल तर तो अपात्र ठरविणे योग्य होणार नाही. अनेक व्यक्तींचे वय 70 पेक्षा अधिक असेल, तरी ते पूर्ण सक्षमतेने काम करतात हे आपण सार्वजनिक जीवनात पहातो आणि एखादा उमेदवार 70 पेक्षा अधिक वयाचा असेल तर त्याला निवडून द्यायचे की नाही ते सभासद ठरवतील. तेव्हा ही दुरुस्ती मागे घ्यावी अशी माझी सूचना आहे.

मा. संचालक सी.ए. श्री. शेलार – आपली सूचना मान्य आहे. फक्त वय वर्षे 70 निश्चित करताना, सर्वसाधारण बँकांच्या सी.ई.ओ. पदासाठी असलेली वयोमर्यादा आम्ही गृहित धरली होती.

सी.ए. श्री. उदय कर्वे (सभासद क्र. 20902) – याबबात माझा अभिनिवेष नाही. मी माझं मत मांडलं आहे. सर्व सभासद ठरवतील त्याप्रमाणे आपण निर्णय घ्यावा.

मा. संचालिका सौ. आंबेकर – पोटनियमात सुचविलेली वाढ कलम 26(1) (o) वगळून पुढील ठराव मी मांडत आहे.

ठराव क्रमांक 6- बँकेच्या पोटनियम क्र. 20, 24(i), (ii), (iv), **{** 26(1) (o) वगळून **}** मधील दुरुस्ती/ बदल यास ही वार्षिक सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे.

सूचक – श्री. प्रकाश भिकू भुर्के (सभासद क्र. 5101)
अनुमोदक – श्री. मुकुंद गोविंद कुलकर्णी (सभासद क्र. 4891)

ठराव एकमताने मंजूर

यानंतरच्या विषयाबाबतची माहिती मा. संचालिका सौ. पेंढरकर यांनी सभेस दिली.

विषय क्रमांक 7 –बँकेच्या संचालकांनी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रिझर्व्ह बँकेच्या मास्टर सर्क्युलरमधील सूचनांचा अंगीकार केला असल्याची नोंद घेणे / माहिती देणे.

मा. संचालिका सौ. पेंढरकर यांनी बँकेच्या संचालकांनी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सूचनांचा अंगिकार केला असल्याचे सभेस सांगितले. बहुराज्यीय सहकारी कायदा 2002 च्या कलम 39 (1) (एन) मधील तरतुदींप्रमाणे पुढील ठराव मांडत असल्याचे सांगितले.

ठराव क्रमांक 7 – भारतीय रिझर्व्ह बँकेने सहकारी बँकांच्या संचालकांसाठी RBI/2024-25/01 DoR.HGG.GOV.No.1/ 18.10.010/2024-25 Dt. April 1, 2024 या मास्टर सर्क्युलरद्वारे मार्गदर्शक सूचना (Do's & Don't) जारी केल्या आहेत. डोंबिवली नागरी सहकारी बँकेच्या संचालकांनी मास्टर सर्क्युलरमधील सूचनांचा अंगीकार केला असल्याची ही सभा नोंद घेत आहे.

सहकारी बँकांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सरव्यवस्थापक) यांचेसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने दि. 25 जून 2018 रोजी निश्चित केलेले निकष (Fit & Proper Criteria) सूचित केले आहेत. तसेच बँकेच्या पोटनियम क्रमांक 35 व 36 मध्येही त्यांचे अधिकार व कर्तव्ये इत्यादी निश्चित केले आहे. या दोन्ही बाबी सरव्यवस्थापकांना लागू केल्या आहेत. त्याची ही सभा नोंद घेत आहे.

त्याचप्रमाणे बँकेने, अधिकारी तसेच कर्मचा-यांसाठी स्थायी आदेश (Standing Orders) तयार केले असून त्याची नोंदणी कामगार आयुक्त, ठाणे जिल्हा(Labor Commissioner Office, Thane) यांचेकडे केली आहे. त्याचीही ही सभा नोंद घेत आहे.
सूचक – श्री. गजानन र. जोशी (सभासद क्र. 26756)
अनुमोदक – श्री. सुरेश माधव जोशी (सभासद क्र. 24086)
ठराव एकमताने मंजूर

यानंतर मा. संचालक श्री. फणसे यांनी पुढील विषय सभेपुढे सादर केला.

विषय क्रमांक 8 – संचालकांना व त्यांच्या कुटुंबियांना (मुदत ठेवींच्या तारणावर) दिलेल्या कर्जांच्या तपशीलाची नोंद घेणे.

याबाबत माहिती देताना श्री. फणसे यांनी सांगितले की, रिझर्व्ह बँकेने सहकारी बँकांना जे निर्देश दिले आहेत, त्यानुसार सहकारी बँकेच्या संचालक व त्यांच्या कुटुंबियांनी त्याच बँकेतून विमा पॉलिसी अथवा त्यांच्या स्वतःच्या मुदत ठेवींच्या तारणावरील कर्जांखेरीज कोणतेही अन्य कर्ज घेतलेले असू नये.

बहुराज्यीय सहकारी कायदा 2002 मधील कलम 39(3) प्रमाणे संचालकांना व त्यांच्या कुटुंबियांना दिलेल्या कर्जाची माहिती वार्षिक सर्वसाधारण सभेसमोर सादर करणे आवश्यक असते. सदरची माहिती वार्षिक अहवालात नमूद केली आहे.
आपल्या बँकेच्या संचालकांनी व त्यांच्या नातेवाईकांनी विमा पॉलिसी अथवा स्वतःच्या मुदत ठेवींच्या तारणावर कर्ज घेतलेले नाही. परंतू त्यांच्या नातेवाईकांनी घेतलेल्या कर्जाबाबतचा तपशील अहवालात नमूद केला आहे. तरी याविषयी पुढील ठराव सभेपुढे मांडत आहोत.

ठराव क्रमांक 8 – दि. 31 मार्च 2024 अखेर संचालकांना व त्यांच्या कुटुंबियांना (त्यांच्या स्वतःच्या मुदत ठेवींच्या तारणावर) दिलेल्या कर्जाची, तसेच सदर व्यक्तींना अन्य कुठलेही कर्ज दिले गेले नसल्याची ही सभा नोंद घेत आहे.

सूचक – श्री. माधव गंगाधर डोंगरे (सभासद क्र. 17100)
अनुमोदक – श्री. मुकुंद गोविंद कुलकर्णी (सभासद क्र. 4891)
ठराव एकमताने मंजूर

मा.संचालक श्री. वाळुंजकर यांनी पुढील विषय सभेपुढे मांडला.

विषय क्रमांक 9- 2025-26 या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षक नेमण्याचे व त्यांचे सेवाशुल्क ठरविण्याचे वार्षिक सर्वसाधारण सभेचे अधिकार संचालक मंडळास देणे.

याबाबत माहिती देताना श्री. वाळुंजकर यांनी सांगितले की, बहुराज्यीय सहकारी कायदा, 2002 कलम 70(2) प्रमाणे वैधानिक लेखापरीक्षक नेमण्याचे व कलम 70(b) प्रमाणे त्यांचे शुल्क निश्चित करण्याचे अधिकार सर्वसाधारण सभेस आहेत. त्याचप्रमाणे, बँकिंग नियमन कायद्यात झालेल्या बदलांप्रमाणे वैधानिक लेखापरीक्षक नेमण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेची

अनुमती मिळणेही आवश्यक झाले आहे. त्याअनुषंगाने आर्थिक वर्ष 2024-25 साठी बँकेकरीता वैधानिक लेखापरिक्षकांच्या नियुक्तीकरीता भारतीय रिझर्व्ह बँकेकडे शिफारस करण्याचे अधिकार बँकेच्या दि. 14 सप्टेंबर 2023 रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेने संचालक मंडळास दिले होते. त्यानुसार सध्याचे वैधानिक लेखापरिक्षक (मे. पी.जी. भागवत एल.एल.पी.) यांच्या 2024-25 करीताच्या नियुक्तीसाठीची परवानगी रिझर्व्ह बँकेने दिली आहे.

पुढील आर्थिक वर्षासाठी (2025-26) वैधानिक लेखापरिक्षकांच्या नियुक्तीकरीता रिझर्व्ह बँकेकडे शिफारस करण्याचे अधिकार संचालक मंडळास द्यावेत असा ठरावही यावेळी प्रस्तावित आहे. प्रमाणित लेखापरीक्षकांच्या यादीतून ही निवड करावयाची असते. त्या यादीतील सक्षम लेखापरीक्षकांची निवड आपण करीत असल्याची माहिती त्यांनी सभेस दिली. याविषयी त्यांनी पुढील ठराव सभेपुढे सादर केला.

<u>ठराव क्रमांक 9-</u>

दि. 14 सप्टेंबर 2023 रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेने संचालक मंडळास दिलेल्या अधिकारांप्रमाणे आर्थिक वर्ष 2024-25 साठी वैधानिक लेखापरिक्षक म्हणून नियुक्ती केलेल्या मे. पी. जी. भागवत एलएलपी यांच्या नियुक्तीची अनुमती रिझर्व्ह बँकेने दिली आहे.

आर्थिक वर्ष 2025-26 साठी वैधानिक लेखापरिक्षक नेमण्याचे व त्यांचे शुल्क निश्चित करण्याचे तसेच त्यांचेबाबत रिझर्व्ह बँकेकडे शिफारसी करण्याचे वार्षिक सभेचे अधिकार ही वार्षिक सर्वसाधारण सभा संचालक मंडळास देत आहे.
सूचक – श्री. मोहन दिनकर पाठक (सभासद क्र. 9062)
अनुमोदक – श्री. अरूण गणपत पवार (सभासद क्र. 20791)

ठराव एकमताने मंजूर

मा. संचालक श्री. आरोलकर यांनी सभेपुढे सादर केला.

<u>विषय क्रमांक 10-</u> बँकेचे निधी / तरतुदी (Reserces/ Provisions) अन्य आवश्यक अशा खात्यांमध्ये वा नफा-तोटा खात्यांमध्ये वर्ग करण्याचे अधिकार संचालक मंडळास देणे.

<u>ठराव क्रमांक 10 –</u>

बहुराज्यीय सहकारी कायदा, भारतीय रिझर्व्ह बँकेचे निर्देश, बँकेच्या उपविधीतील कलम 42 यांच्या अधीन राहून, बँकेचे निधी / तरतुदी व नफा – तोटा विभागणीतून अन्य आवश्यक अशा खात्यांमध्ये वर्ग करण्याचे वा नफा-तोटा खात्याकडे वर्ग करण्याचे अधिकार दि. 30-09-2024 रोजीची ही वार्षिक सर्वसाधारण सभा, संचालक मंडळास देत आहे.
सूचक – श्री. शामकांत मोतीराम वाणी (सभासद क्र. 33935)
अनुमोदक – श्री. मुकुंद गोविंद कुलकर्णी (सभासद क्र. 4891)

ठराव एकमताने मंजूर

<u>विषय क्रमांक 11 –</u> अनुपस्थितीबाबत कळविणा-या सभासदांच्या रजा मंजूर करणे.
मा. अध्यक्षांनी सांगितले की या विषयानुषंगाने एकंदर 32 सभासदांनी आपले अर्ज सादर केले आहेत. सभेत यावर चर्चा झाली व मा. अध्यक्ष श्री. धारगळकर यांनी व पुढील ठराव सभेपुढे सादर केला.

ठराव क्रमांक 11- दि. 27 सप्टेंबर, 2024 रोजीचे कार्यालयीन कामकाज संपेपर्यंत बँकेस प्राप्त झालेल्या सभासदांच्या अनुपस्थितीबाबतचे अर्ज मंजूर करण्यात येत आहेत.
सूचक – श्री. सुरेश रघुनाथ पाटील (सभासद क्र.8137)
अनुमोदक – श्री. सुरेश पिल्लई (सभासद क्र. 103151)
ठराव एकमताने मंजूर

सभेस 825 सभासद उपस्थित होते. मा. अध्यक्षांनी सभा संपन्न झाल्याची घोषणा केली. त्यानंतर सभासदांनी आयत्या वेळचे विषय मांडले.

श्री. गोपाळ वैद्य (सभासद क्र. 4833) – नांदिवली पथ शाखेत व्यावसायिकांचा मेळावा योजला होता. असे मेळावे ठिकठिकाणी योजावेत.

श्री. मोहन पाठक (सभासद क्र. 9062) – 15G किंवा 15H फॉर्म 15 एप्रिल रोजी उपलब्ध होतो. त्यापूर्वीच TDS कापला गेला आहे. तो फॉर्म लवकर उपलब्ध करावा.

मा. अध्यक्ष श्री. धारगळकर – सूचनेचा निश्चितच विचार केला जाईल.

श्री. अरूण पवार (सभासद क्र. 116482) – माझी थकबाकी आहे. माझी सर्व खाती बंद केली आहेत. मी सर्व थकीत रक्कम भरणार आहे. त्या खात्यांमधून मला रु. 50,000/- काढण्याची अनुमती द्यावी.

सरव्यवस्थापक श्री. सिंग – हा सभेचा विषय नाही. सभा संपल्यावर तुम्ही मला भेटावे.

श्री. महेश शुक्ल (सभासद क्र. 33886) – मुख्य किंवा विष्णूनगर शाखेत आठवड्यातून एखादा दिवस मा. संचालकांना भेटण्याची वेळ निश्चित करता येईल का ? KYC Updation झाले आहे असा SMS करण्याची सुविधा उपलब्ध करावी.

मा. अध्यक्ष – आपल्या सूचनेचा नक्की विचार करण्यात येईल.

श्री. सुरेश जोशी (सभासद क्र. 24086) – सूचना नसतानाही ECS द्वारे रक्कम कापली गेली आहे.

मा. सरव्यवस्थापक – माहिती घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल.

श्री. विलास मोरे (सभासद क्र. 22164) - 15G/ 15H फॉर्म बाबत SMS द्वारे अवगत करावे.

एक सभासद – ठेवींवरील व्याजदराबाबत विचार करावा.

श्री. सुरेश पाटील (सभासद क्र. 8137) – आठवड्यातील कामकाजाच्या दिवशी (working Day) वार्षिक सभा योजल्यास ती दुपारच्या वेळी ठेवावी.

श्री. शिवाजी दिघे - कणसंचय योजना बंद करू नये. छोट्या व्यावसायिकांसाठी ती खूप उपयुक्त आहे. कर्ज कागदपत्रांबाबत सुसुत्रता आणावी.

सौ. सुरेखा अनगळ (सभासद क्र. 85594) – खात्यात किती रक्कम शिल्लक आहे त्याची माहिती मिळत नाही. ज्या सोसायटीच्या खात्याला दरमहाची मेटेनन्सची रक्कम पाठवावी अशी सूचना दिली आहे ती रक्कम नावे टाकणे बंद झाले आहे. मी सूचना देईपर्यंत सदर मेटेनन्सची रक्कम नावे टाकणे बंद करू नये अशा सूचना शाखांना द्याव्यात ही विनंती.

मा. सरव्यवस्थापक – संबंधित शाखेला कळविण्यात येईल.

एक सभासद – विष्णूनगर शाखेचे ए.टी.एम. मशीनही बंद असते. मुख्य शाखेत एकच काऊंटर सुरु असते.

श्री. शामकांत वाणी (सभासद क्र. 33935)- भाजी विक्रेते, छोटे चहा विक्रेते, वडापाव विक्रेते यांना मायक्रोफायनान्स कसा उपलब्ध करून देता येईल याचा विचार करावा.

यानंतर अन्य कोणतेही प्रश्न / सूचना नसल्याने सभा समाप्त झाली.

संचालक मंडळ सभा दि. 19 ऑक्टोबर 2024 रोजीच्या सभेतील ठराव क्र. 3(8) नुसार उपरोक्त इतिवृत्त वाचून मंजूर केले.

-0-0-0-0-